MHSN05000530-2011

## रे.दि.मु.नं. ११८/२०११ मधील निशाणी २०९ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२९ संजय हंबीरराव जाधव यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र.२९ हे दिनांक ०६.१०.२०२० रोजी मयत झालेले आहेत. वादींना मयत प्रतिवादी क्र.२९ यांच्या मृत्युबाबतची कागदपत्रे मिळण्यास विलंब झाला. त्यामुळे त्यांना मुदतीत वारस वेळेत रेकॉर्डवर घेता आले नाहीत. परंतु, त्यांचे वारस दाव्याचे कामी रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सबब, सदरचा झालेला विलंब माफ होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीतर्फे सदर अर्जाच्या पाठिमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांचे कथनानुसार वादींनी प्रतिवादी क्र.२९ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. प्रस्तुत अर्ज वेळेत दिलेला नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. उभय पक्षकार यांची परस्पर विरोधी कथने याचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दा उपस्थित होतो. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.२९ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होण्यास वादी पात्र आहेत का? | होकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

५.  अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षकारांतर्फे सन्माननीय विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटप व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादींनी मयत प्रतिवादी यांचे वारस वेळेत रेकॉर्डवर आणलेले नाहीत. परंतु, वादी-प्रतिवादी यांच्यातील वाद एकाच वेळी संपुष्टात आणण्याकरीता मयत प्रतिवादी क्र.२९ यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. परंतु, अशा परिस्थितीत झालेल्या विलंबाबात खर्च आकारणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेशः-

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज रक्कम रुपये १०००/– कॉस्ट प्रतिवादीना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PANKAJA PRASAD AJGAONKAR
Date: 2024.10.21 17:44:13 +0530

इस्लामपूर (पंकजा प्र. आजगांवकर)

दिनांक- २१.१०.२०२४ ४ थे सह दि.न्या.क.स्तर, इस्लामपूर

MHSN05000530-2011

<u>रे.दि.मु.नं. ११८/२०११ मधील निशाणी २११ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.२९ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस विलंब झाल्याने, त्यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र.२९ हे दिनांक ०६.१०.२०२० रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे वारस दाव्याचे कामी रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. वादींना मयत प्रतिवादी क्र.२९ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब झालेला आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द अबेटमेंटचा आदेश झालेला आहे. तरी सदरचा अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीतर्फे सदर अर्जाच्या पाठिमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांचे कथनानुसार वादींनी प्रतिवादी क्र.२९ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. प्रस्तुत अर्ज वेळेत दिलेला नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. उभय पक्षकार यांची परस्पर विरोधी कथने याचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दा उपस्थित होतो. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल होऊन मिळणेस वादी पात्र आहे का ? | होकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

<u>**कारणमिमांसा**</u>

**५.** अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षकारांतर्फे सन्माननीय विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटप व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२९ हे दिनांक ०६.१०.२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादी यांना मयत प्रतिवादी क्र.२९ यांचे वारस वेळेत रेकॉर्डवर आणता आले नाहीत. त्यामुळे त्यांचे विरुध्द अबेटमेंटचा आदेश पारीत झालेला आहे. हे दिलेले कारण संयुक्तिक असल्याचे दिसून येते. या सर्व बाबींचा विचार करता वादीनी दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्याबाबतचा झालेला विलंब न्यायाच्या दृष्टिने खर्च आकारुन मंजूर करण्यात आला आहे. सबब, खालीप्रमाणे आदेशः-

<u>**आदेश**</u>

१. वादीचा अर्ज रक्कम रुपये ५००/– कॉस्ट प्रतिवादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PANKAJA PRASAD AJGAONKAR
Date: 2024.10.21 17:44:19 +0530

इस्लामपूर (पंकजा प्र. आजगांवकर)

दिनांक-२१.१०.२०२४ ४ थे सह दि.न्या.क.स्तर, इस्लामपूर

MHSN05000530-2011

<u>रे.दि.मु.नं. ११८/२०११ मधील निशाणी २१३ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादीनी दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी व वारस रेकॉर्डवर घेणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार प्रतिवादी क्र.२९ हे दिनांक ०६.१०.२०२० रोजी मयत झालेले आहेत. त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.२९ यांचे नांवासमोर 'मयत' असे लिहिण्यात येऊन वारसांची नांवे लिहिणेस परवानगी मिळावी. तसेच, त्याअनुषंगाने दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे कथन केले आहे. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादीतर्फे सदर अर्जाच्या पाठिमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांचे कथनानुसार वादींनी प्रतिवादी क्र.२९ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. प्रस्तुत अर्ज वेळेत दिलेला नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

४. उभय पक्षकार यांची परस्पर विरोधी कथने याचा विचार करता प्रस्तुत अर्जाच्या निकालासाठी खालील मुद्दा उपस्थित होतो. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.२९ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्या-साठी परवानगी मिळणेस वादी पात्र आहे का? | होकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

५. अर्ज व म्हणणे वाचले. उभय पक्षकारांतर्फे सन्माननीय विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी वाटप व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.२९ हे दिनांक ०६.१०.२०२० रोजी मयत झाल्याचे दिसून येते. वादीना मयत प्रतिवादींचे वारस वेळेत रेकॉर्डवर आणता आले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द अबेंटमेंटचा आदेश पारित करण्यात आला होता. परंतु, प्रतिवादी क्र.२९ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्याबाबतचा अर्ज व विलंब माफ होऊन मिळण्याबाबतचा अर्ज मंजूर करण्यात आला आहे. सबब, न्यायाच्या दृष्टिने प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे, करिता, खालीप्रमाणे आदेशः-

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तुत आदेशानुसार दाव्यामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

Digitally signed by PANKAJA PRASAD AJGAONKAR
Date: 2024.10.21 17:44:30 +0530

इस्लामपूर (पंकजा प्र. आजगांवकर)

दिनांक २१.१०.२०२४ ४ थे सह दि.न्या.क.स्तर, इस्लामपूर

| - : C E R T I F I C A T E : - | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. file, order are same word to word, as per the original Order. | | |
| Name of Stenographer | :- | S.N. Pethkar |
| Court Name | :- | Pankaja P. Ajgaonkar<br>4th Jt. Civil Judge (J.D.) and J.M.F.C., Islampur |
| Date of decision | :- | 21.10.2024 |
| Order signed by PO. on | :- | 21.10.2024 |
| Order uploaded on | :- | 21.10.2024 |